Postal Registration No. KLR-114/-2024-26 Reg.No.54851/1983 RNI.New Delhi

सर्वसामान्यांच्या चळवळीतील अग्रेसर... ...रौप्यमहोत्सवी-राज्यस्तरीय वृत्तपत्र!

# क्रांतीसिंह

सायंदैनिक संस्थापक-संपादक : सुनंदा मोरे (बी.कॉम.ऑनर्स) किंमत : ३ रूपये

*वर्ष ४२/अंक २७८ * मंगळवार, ता. ११ फेब्रुवारी २०२५ * डाक आवृत्ती ता १२/०२/२०२५ *

## आदर्श राज्याचा वस्तुपाठ छ. शिवाजींचा

### ई मध्यवर्ती संग्रहालय दालनाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उदघाटन

नागपूर(प्रतिनिधी):- जलव्यवस्थापन, पर्यावरण रक्षण, कायदा व सुव्यवस्था, महिलांचे संरक्षण, सर्व जाती धर्माचा सन्मान असा आदर्श वस्तुपाठ छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभाराच्या माध्यमातून दिला आहे. हा समृद्ध वारसा जपण्यासह तो नव्या पिढीपर्यंत प्रवाहित होण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मध्यवर्ती संग्रहालयात शिवकालीन शस्त्रांच्या प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर कविवर्य सुरेश भट सभागृह येथे आयोजित मुख्य कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशीष शेलार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रभारी विभागीय आयुक्त माधवी खोडे, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, पोस्ट मास्टर जनरल (नागपूर परिक्षेत्र) शोभा मधाळे, मुधोजीराजे भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी ज्या वाघनखाचा वापर केला होता ती वाघनखे मोठ्या



प्रयत्नानंतर आपण आणली आहेत.सुरुवातीला साता ऱ्याच्या संग्रहालयामध्ये ही वाघ नखे ठेवण्यात आली. महारा ष्ट्राला मिळालेल्या या शौर्याच्या वारशाची अनुभूती पश्चिम महाराष्ट्रातील हजारो तरुणांनी, विद्यार्थ्यांनी, नागरिकांनी घेतली. ही अनुभूती घेण्याची संधी विदर्भातील युवकांना, जनतेला मिळाली असून याचा अधिकाधिक लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा यासाठी संबधित विभागाने नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

महाराष्ट्रावर ज्यावेळी आक्रमणे झाली त्याकाळी आपले संस्कार, आपली संस्कृती, स्वभाषा, स्वधर्म हा जिवंत राहील की नाही अशा प्रकारची अवस्था होती. मात्र शिवरायांनी हे स्वातंत्र्य अबाधित ठेवले. आज आपण जे स्वातंत्र्य उपभोगतो आहोत त्या स्वातंत्र्याची पायाभरणी छत्रपती शिवरायांनी केली असल्याचे त्यांनी सांगितले.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले, राज्याचा गौरवशाली इतिहास सर्वसामान्यापर्यंत पोहोचविण्यावर सांस्कृतिक कार्य विभागाचा भर आहे. त्यातीलच वाघनखांचे प्रदर्शन हा एक भाग आहे. छ. शिवाजी महाराजांचे शौर्य या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत नेण्याचा हा प्रयत्न आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे मविरासत से विकासफ हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून वाटचाल सुरू असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.

या कार्यक्रमात शिवकालीन शस्त्रे या माहिती पुस्तिकेचे तसेच वाघनखावर आधारित विशेष टपाल तिकीटाचे अनावरण करण्यात आले.

प्रास्ताविक मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रसाद ओक यांनी केले तर आभार पुरातत्व व वस्तूसंग्रहालय संचालनालयाचे संचालक तेजस गर्गे यांनी मानले.

मध्यवर्ती संग्रहालयात वाघनखे व शिवशस्त्र दालनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशीष शेलार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्य मंत्री यांचे अपर मुख्य सचिव तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रभारी विभागीय आयुक्त माधवी खोडे, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मुधोजीराजे भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

शिवकालीन इतिहासाचा साक्षीदार होण्याची नागपूरकरांना ही अपूर्व संधी मिळाली आहे. वाघनखे ही महाराष्ट्राच्या शौर्याचा मनबिंदू आहे. स्वराज्याच्या रक्षणासाठी वाघनखांचा चपखल वापर छत्रपती शिवाजी महाराजांनी केला. माजी सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार व अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी प्रयत्नपूर्वक ही वाघनखे महाराष्ट्रात आणली आहेत. महाराष्ट्रातील हजारो युवक या शिवशस्त्र शौर्य प्रदर्शनातून प्रेरणा घेतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. मराठाकालीन शस्त्रास्त्रे, वाघनखे याची त्यांनी पाहणी केली. या ठिकाणी साहसी मर्दानीखेळ, चर्चासत्र, व्याख्याने यानिमित्ताने आयोजित केले जातील असे त्यांनी सांगितले.

## आचार्य विद्यासागरजींचे आयुष्य धर्म, संस्कृती-राष्ट्रासाठी

आचार्य विद्यासागर महाराजजींच्या देहाचा प्रत्येक कण आणि जीवनाचा क्षण अन क्षण धर्म, संस्कृती आणि राष्ट्राला समर्पित राहिला असल्याचे विधान केंद्रीय गृह व सहकार मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शहा यांनी केले आहे. छत्तीसगडच्या राजनांदगाव येथे आचार्य गुरु श्री विद्यासागर जी महाराज यांच्या प्रथम समाधी स्मृती महोत्सवाच्या निमित्ताने प्रमुख अतिथी म्हणून ते उपस्थित होते.या विशेष प्रसंगी अमित शहा यांनी आचार्य श्री विद्यासागर जी महाराज यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्यांच्या १०० रुपयांचे स्मरण नाणे, ५ रुपयांचा विशेष लिफाफा, १०८ पाऊलखुणा



आणि चित्रे प्रकाशित केली व प्रस्तावित समाधी स्मारक मविद्यायतनफ्चा शिलान्यास केला.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आचार्य जींच्या प्रथम पुण्यतिथीच्या निमित्ताने १०० रुपयांचे स्मारक नाणे आणि ५ रुपयांचा लिफाफा जारी करण्यास मान्यता देऊन भारतीय संत परंपरेला गौरवले आहे.

आचार्य श्री विद्यासागर जी महाराज हे एक युगपुरुष होते, ज्यांनी नवीन विचार आणि नवीन युगाचा प्रारंभ केला. कर्नाटकमध्ये जन्मलेला एक बालक आपल्या तप आणि साधनेच्या बळावर भारतीय संस्कृती, भारतीय भाषा आणि भारताची ओळख यांचे प्रकाशक बनले. इतिहासात फारच कमी संतांना असे मान मिळाले असेल, ज्यांनी धर्मासोबतच राष्ट्राची काय व्याख्या असावी याचा जागतिक स्तरावर प्रचार केला असेल, अशा शब्दात नवभारताचे निर्माते अमित शहा यांनी आपली शब्दसुमनांजली अर्पण केली.जैन मुनींनी ज्ञानाची निर्मिती केली, देशाला एकात्मतेच्या सूत्राने बांधले आणि गुलामीच्या काळातही राष्ट्रीय चेतनेची ज्योत तेवत ठेवली.

मूकमाटी महाकाव्याचे रचनाकार आचार्य विद्यासागर जींनी अंतिम श्वासापर्यंत मनसा, वाचा, कर्मणाच्या तत्त्वावर राष्ट्रधर्माचे पालन केले, असल्याची प्रांजळ कबुली भारतीय संस्कृती आणि परंपरांचे रक्षक असलेले शाह यांनी यावेळी दिली. त्यांनी भारतीय भाषांचे संवर्धन,देश गौरवाचा जागतिक प्रचार, आणि इंडियाऐवजी भारत ही ओळख निर्माण करण्यावर भर दिला.

## पुढील साहित्य संमेलन इचकरंजीत करण्याचा प्रयत्न

कोल्हापूर(जिमाका):- सध्याच्या डिजीटल युगात वाचकांनी डिजिटल वाचन साहित्याबरोबरच अधिकाधिक पुस्तके खरेदी करुन मराठी वाचन संस्कृती अधिक गतिमान करावी, अशी अपेक्षा व्यक्त करुन १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन इचकरंजीत आयोजित करण्यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करुया, असे आवाहन माजी मंत्री प्रकाश आवाडे यांनी केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालय व कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने इचलकरंजी येथे ६ व ७ फेब्रुवारी दरम्यान कोल्हापूर ग्रंथोत्सव २०२४ संपन्न झाला. या कार्यक्रमांतर्गत समारोप कार्यक्रमात आवाडे बोलत होते. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर, माहिती अधिकारी वृषाली पाटील, कोल्हापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. सुशांत मगदूम, ग्रंथालय संघ कार्यवाहक भीमराव पाटील, आपटे वाचन मंदिराच्या अध्यक्षा सुषमा दातार, प्रसाद कुलकर्णी यांच्यासह कोल्हापूर ग्रंथोत्सव २०२४ जिल्हा समन्वय समितीचे सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रंथोत्सव कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान आवाडे यांच्या हस्ते करण्यात आला.

आवाडे म्हणाले, लेखकांनी वाचकांची आवड ओळखून विविध विषयांवर आधारीत त्या त्या भाषेतील पुस्तके उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करावा. सध्या डिजिटलायझेशनमुळं सर्व बाबी ऑनलाईन मिळत आहेत. अशा वेळी ऐतिहासिक, सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण आदी विषयांची जगभरातील लेखकांची पुस्तकं विविध भाषांमध्ये डिजिटल पद्धतीनं उपलब्ध होत आहेत. यामुळे पुस्तकांच्या प्रती खरेदी करुन वाचण्याबरोबरच ई बुक वाचकांची संख्या वाढत आहे. वाचन आणि वाचकांच्या चळवळीला प्रेरणा देण्याच्या उद्देशानेच इचलकरंजीत ग्रंथ महोत्सव घेण्यात आला असून या ग्रंथोत्सवामुळे इचलकरंजीतील वाचकांना एकाच छताखाली दर्जेदार ग्रंथ खरेदीची संधी मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

समारोप कार्यक्रमापूर्वी झालेल्या कवी संमेलनाला नागरिकांनी उत्फुर्त प्रतिसाद दिला. प्रास्ताविकातून जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर यांनी ग्रंथोत्सवा दरम्यान घेण्यात आलेल्या कार्यक्रमांची माहिती दिली. या दोन दिवसांत ग्रंथ दिंडी, मराठी भाषेचा अभिजात दर्जा या विषयावर ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ. हिमांशू स्मार्त यांचे व्याख्यान तसेच कुटुंब रंगलय काव्यात हे एक पात्री काव्य नाट्यानुभव मुंबई येथील विसुभाऊ बापट यांनी सादर केले.



मला भावलेले पुस्तक यावर निवडक विद्यार्थ्यांसह उपविभागीय अधिकारी मौसमी चौगुले यांनीही मनोगत व्यक्त केले. निवडक शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील उत्कृष्ट वाचकांचा गौरव करण्यात आला. तसेच डिजिटल युगातील वाचनसंस्कृती व ग्रंथाल यांची भूमिका या विषयावर ज्येष्ठ संपादक निखिल पंडितराव यांनी मार्गदर्शन केले.

स्वागत सुषमा दातार यांनी केले. सूत्रसंचालन यशवंत मोहिते यांनी केले तर आभार प्रसाद कुलकर्णी यांनी मानले. या दोन दिवसीय ग्रंथोत्सवात पुस्तकांचे १६ स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉल्स वर सुमारे २ लाख ९३ हजार ५०० रुपयांचच्या १ हजार १८७ ग्रंथांची विक्री झाली

## हद्दवाढीसाठी शहरात आंदोलनाचे पर्व सुरु

कोल्हापर(प्रतिनिधी):-कोल्हापूर शहराच्या हद्दवाढी साठी अवघे शहर आता आंदोलनाच्या पवित्र्यात आहे. या आंदोलनाची सुरुवात सर्व पक्षीय समितीच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून सुरू आहे. शिवाजी पेठेत फलक उभारून जनजागृ तीला सुरुवात झाली. आता हे लोन सर्व पेठा-पेठांमधून पसरत आहे. इतर शहरांची हद्दवाढ होते, मग कोल्हापूरची हद्दवाढ का होत नाही, असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. आंदोलनाचा एल्गार आता शहरातून पुकारला गेला आहे.नगरपालिकेचे रुपांतर १९७२ साली महापालिकेत झाले. नगरपालिकेची महापा लिका करताना एका इंचानेही हद्दवाढ झाली नाही. त्यापुर्वी १९४६ ला नगरपालिका अस्ति त्वात असताना जेवढी हद्द होती. आजही तेवढीच आहे. तेवढ्याच जागेत ७९ वर्षांत लोकसंख्या दाटीवाटीने राहत आहेत.

अशा प्रकारच्या लक्षवेधी फलकाच्या माध्यमातून जन जागृती करून एक व्यापक जनआंदोलन उभा करण्याची तयारी शहरातून सुरू झाली आहे. यापूर्वी टोलविरोधात अशा प्रकारचा लढा उभा कर ण्यात आला होता. टप्प्या टप्प्याने आंदोलन तापवत नेण्यासाठी जनजागृती सुरू आहे. शिवाजी पेठ, मंगळवार पेठ आणि त्यापाठोपाठ आता बुधवार पेठेतही जनजागृतीपर फलक उभा केला जात आहे. समाजाच्या एकेक घटकाला आंदोलनात सहभागी करून घेण्याचा हा प्रयत्न आहे. हद्दवाढीच्या समर्थनार्थ निर्माण झालेल्या कृती समि तीचे कार्यकर्ते अभ्यासपूर्ण मांडणी करून प्रशासन, शास नाकडे रेटा लावत आहेत. हद्दवाढ का गरजेची आहे आणि ही मागणी का रेटून धरावी लागत आहे, यासाठी कार्यक र्त्यांचा आटापिटा सुरू आहे. कृती समितीचे सदस्य ॲड. बाबा इंदुलकर, निमंत्रक आर. के. पोवार, सातत्यपूर्ण सहभाग असणारे बाबा पार्ट, महेश जाधव, सचिन चव्हाण, दिलीप देसाई, अशोकराव भंडारे हे अभ्यासपूर्ण मांडणी करण्या सोबतच आंदोलनासाठी संघ टन वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यासाठी दररोज सम न्वय ठेवण्याचे काम कृती समितीचे कार्यकर्ते करत आहेत. प्रत्येक पेठांमध्ये, विभागा मधील कार्यकर्त्यांशी संपर्क करणे त्यांच्यासोबत समन्वय ठेवणे त्यांचा सहभाग वाढविणे यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

**वडगांव नगरपरिषद, वडगांव, जि. कोल्हापूर**

**जाहीर आवाहन**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी करणेकरिता सदर अधिनियमाचे कलम ३(1) व शासनाद्वारे वेळोवेळी निर्गत आदेश शासन निर्णय व परिपत्रके याद्वारे नागरिकांना पुरवण्यात येत असलेल्या क वर्ग नगरपरिषदेस लागू होणाऱ्या एकूण ६५ लोकसेवा वडगांव नगरपरिषदेद्वारे अधिसूचित करणेत आलेल्या आहेत. सदरची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित करणेत आलेली आहे. तसेच अधिसूचित लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे, नियम कालमर्यादा, शुल्क, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलिय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधकारी यांचा तपशील https://mahaulb.in/MahaULB/home/ulbilst/viewmore या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेला असून नगरपरिषदेच्या दर्शनी भागातील सूचनाफलकावर देखील पहावयास मिळेल.

**ता. १०/०२/२०२५**

जा. क्र. वनप/सा.प्र/१८७४/२०२४-२५

सही/-

**मुख्याधिकारी,**

**वडगांव नगरपरिषद, वडगांव.**